स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडाविद्यापीठ,नांदेड

समाज विज्ञान शाखेतील (अर्थशास्त्र) तत्वज्ञान पारंगत

(पी.एच.डी.) पदवीसाठी सादर करण्यात येणा-या शोध प्रबंधाचा आराखडा

---- संशोधन विषय ----

" हिंगोली जिल्हा परिषद अंतर्गत कृषी विभागामार्फत राबवण्यात येणा-या योजनांचा अभ्यास "

(कालखंड २००४-२०१४)

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.जे.एस.भोयर

कै.बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, हिंगोली-४३१५१३.

संशोधन कर्ता

भगवानराव भाऊराव मस्के

(एम.ए.,एम.एड्., एम.फिल)

जुलै २०१६

प्रमाणपत्र

दिनांक: /   /२०

प्रमाणित करण्यात येते की, श्री.भगवानराव भाऊराव मस्के हे माझ्या मार्गदर्शनाखाली " हिंगोली जिल्हा परिषद अंतर्गत कृषी विभागामार्फत राबवण्यात येणा-या योजनांचा अभ्यास " या विषयावर पीएच.डी.पदवीसाठी संशोधन करीत आहेत.

करिता प्रमाणपत्र देण्यात येते.

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.जे.एस.भोयर

कै.बाबुराव पाटील कला व विज्ञान
महाविद्यालय हिंगोली-४३१५१३.

“ हिंगोली जिल्हा परिषद अंतर्गत कृषी विभागामार्फत राबवण्यात येणा-या योजनांचा अभ्यास ”

कालखंड २००४-२०१४

प्रस्तावना

भारताच्या विकासात जिल्हा हा पायाभुत घटक मानला जातो.म्हणुन त्रिस्तरीय पंयायतराज व्यवस्थेतील जिल्हा स्तरावरील जिल्हा परिषदेला ग्रामीण विकासाच्या अनुषंगाने महत्वाचे स्थान आहे.जिल्हा परिषद हा पंचायत राज्यातील सर्वात वरिष्ठ घटक आहे. महाराष्ट्रातील वसंतराव नाईक समितीनेही जिल्हा परिषदेला अधिकार देण्याची शिफारस केली.

भारतीय संविधानातील ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार जवळपास सर्वच राज्यात प्रबळ जिल्हा परिषदेची स्थापना करण्यात आली.

आजमितीस भारतात ५३८ तर महाराष्ट्रात ३४ जिल्हा परिषदा आहेत.महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या आधारावर जिल्हा परिषदेचे कामकाज चालते.कलम ६- नुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा परिषद असेल.महाराष्ट्रात १मे १९६२ पासुन जिल्हा परिषद स्थापन करण्यात आली.

जिल्हा परिषदेमध्ये नऊ विषय समित्या व एक स्थायी समिती अशा एकुण दहा समित्या आहेत.भारत हा कृषी प्रधान देश असल्यामुळे त्या समित्यामध्ये कृषी समिती किंवा कृषी विभाग महत्वाचा आहे.कृषी विभागामार्फत शेतक-यांना जास्त उत्पादनात वाढ करण्यासाठी वेगवेगळया योजनाद्वारे अनुदान पुरवल्या जाते.

वसंतराव नाईक समितीने काही जिल्ह्याचे विभाजन करुन नवीन जिल्हे निर्माण केले,तीला अनुसरुन परभणी जिल्ह्याचे विभाजन करुन हिंगोली जिल्हा परिषदेची स्थापना १ मे १९९९ साली झाली.हिंगोली जिल्हयाचे क्षेत्रफळ ४५२६ चौ.की.असुन पाच तालुके तीन नगर परिषदा व तीन महसुली विभाग आहेत.

हिंगोली जिल्ह्यामध्ये पाच तालुक्यामध्ये पाच पंचायत समित्या आहेत. आणि या पंचायत समित्यामार्फत जिल्हा परिषद कृषी विभागमार्फत शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात कृषी औजारे,रासायनिक खते,सिंचन पाईप,तुषार ५०% अनुदानाद्वारे पुरवत असते.तसेच पाचही तालुक्यात तालुका कृषी विभाग आहेत व या कृषी विभागातमार्फत शेतकऱ्यांना शेतीपुरक साहित्य अनुदान स्वरुपात दिले जाते.

स्थानिक स्वराज संस्था व्याख्या व अर्थ

जगातील बहुतांश देशात वेगवेगळ्या प्रकारच्या स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. या संस्था वेगवेगळया देशात वेगवेगळ्या नावाने ओळखल्या जातात. जसे फ्रान्स व ब्रिटनमध्ये स्थानिक शासन(लोकल गव्हर्नमेंट) तर भारतात या संस्थाना स्थानिक स्वराज्य संस्था (लोकल सेल्फ गव्हर्नमेंट) म्हटले जाते.

I) एनसायक्लोपिडीया ऑफ ब्रिटानिका च्या मते

''स्थानिक स्वशासन म्हणजे पुर्ण राज्याऐवजी अंतर्गतदृष्ट्या प्रबंधीत आणि लहान क्षेत्रात निर्णय घेवुन कार्यान्वीत करणारी संस्था म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था होय''

II) एन गोल्डिंगच्या मते

''स्थानिक शासन म्हणजे स्थानिक लोकांनी स्वतःच्या प्रश्नाची व्यवस्था करणे होय''

कृषी विभाग:

जिल्हा कृषी समितीत एकुण अकरा सदस्य असतात. जिल्हा कृषी अधिकारी हा या समितीचा सचिव असतो.कृषी क्षेत्राच्या सर्वांगीन विकासासाठी हि समीती प्रयत्नशिल असते.कृषी विभागामार्फत पीक नियोजन,पीक मोहिम,पीक संरक्षण,रासायनिक खते,मिश्र खते, शेतीची लोखंडी औजारे,पोलाद, सिमेंट वाटप,सुधारित बियाणे वाटप,गोदाम बांधणे, ठिबक सिंचन, अनुदाने या वेगवेगळया योजनांवर खर्च होतात.

पाटबंधारे कृषी पशु संवर्धन आणि वने या क्षेत्रावर केवळ ४% खर्च होताना दिसतो. कारण हि शासनाच्या इतर विभागाकडुनही पार पाडली जातात.

जिल्हा परिषद अंतर्गत तालुकास्तरावर पंचायत समिती मार्फत शेती पुरक अनुदानाला ५०% स्वरुपात शेतक-यांना अनुदान दिले जाते. व शेतक-याचा वाटा ५०% एवढा असतो.

<u>जिल्हा परिषदेचा कार्यकाळ:</u>

जिल्हा परिषदेचा कार्यकाळ पहिल्या बैठकीपासुन पाचा वर्षाचा आहे. काही कारणास्तव मुदतपुर्व बरखास्तीनंतर ६ महिन्याचा आत निवडणुका घेणे बंधनकारक असते.भारतीय संविधानातील ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर संपुर्ण भारतात ही पध्दत राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

<u>अध्ययन विषयाची निवड :</u>

शासनाच्या वाढत्या जबाबदारीतुन शासनाचा वाढणारा खर्च त्यामध्ये भारताची अर्थव्यवस्था कृषीमध्ये पंचवार्षिक योजनामार्फत व अंदाजपत्रकामार्फत शासन कृषीवर अनुदाने,आदाने यावरील अनुदाने जलसिंचन यावरील अनुदानावर मोठ्या प्रमाणात खर्च वाढत आहे. हिंगोली जिल्हा परिषद कृषी विभागांतर्गत शेतक-यांना कोणकोणत्या योजनामार्फत अनुदान देण्यात येतात, त्या योजनाचा अभ्यास करुन २००४-१४ या दहा वर्षाच्या कालावधीत वेगवेगळया कृषी योजनांचा आढावा घेणे.

<u>अध्ययन विषयाची निवड :</u>

१) हिंगोली जिल्हा परिषद अंतर्गत कृषी विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध योजनांचा अभ्यास करणे.

२) शेतक-यांना मिळणा-या योजनावरील एकुण अनुदानावरील असणारे प्रमाण अभ्यासणे.

३) कृषी विभागाअंतर्गत शेतक-यांना दिलेल्या प्रत्यक्ष कृषी अनुदानावरील खर्चाचे अध्ययन करणे.

४) शेतीच्या कोणत्या साधन व सोयीवर किती अनुदान मिळते ते अभ्यासणे.

५) शेतक-यांपर्यंत कृषी विभागामार्फत विविध योजना कीती प्रमाणात पोहचतात ते अभ्यासणे.

६) कृषी अनुदानाचा शेतक-यांच्या उत्पन्नातील व राहणीमानातील बदल अभ्यासणे.

७) अनुदान मिळण्यासाठी शेतक-यांना येणा-या अडचनींचा अभ्यास करणे.

अध्ययन गृहीतके (Hypothesis) :

I) कृषी विकास योजनावरील खर्च वाढत आहे.

II) या योजनेच्या अंम्लबजावणीत दोष आहे.

III) लहान व सिमांत शेतक-यांना मोठया प्रमाणात योजनाचे वाटप करण्यात येते.

IV) शेतक-यांना या योजनेचा लाभ मिळाला आहे.

संशोधन विषयाचे महत्व :

प्रस्तुत संशोधन विषयामध्ये जिल्हा परिषद अंतर्गत कृषी समिती व जिल्ह्यातील पंचायत समित्या आणि कृषी विभागामार्फत शेतक-यांसाठी राबविल्या जाणा-या योजनांचा अभ्यास तसेच शेतक-यांना शेतीसंबधी आदानावर मिळणा-या अनुदानाचा अभ्यास करण्यात येणार आहे. जिल्हा कृषी समितीमार्फत शेतक-यांना ५०% अनुदान वेगवेगळया योजनांवर देण्यात येते. आणि या योजना शेतक-याच्या दृष्टीने कीती उपयुक्त आहे हे अभ्यासाअंती सांगीतले जाईल.अनुदानाचा शेतक-यांनी कृषी विकासासाठी वापर केला किंवा कसे याचा अभ्यास करुन शेतक-यांचे जीवनमान उंचावण्यासाठी उत्पन्न वाढीसाठी,दारिद्रये कमी होण्यसाठी उपयोग झाला आहे का याचाही अभ्यास करुन उपाय सुचविले जातील.

संशोधन पध्दती :

अध्ययन विषयासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्रीचा आधार घेण्यात येईल.

प्राथमिक सामग्रीमध्ये

प्राथमिक माहितीचे संकलन करतांना जिल्हा कृषी अधिकारी-१, तालुका कृषी अधिकारी-५, यांची प्रश्नावलीद्वारे माहिती संकलन करणे, त्यांनंतर मंडळ अधिकारी निवडतांना प्रत्येक तालुक्यातील दोन याप्रमाणे पाच तालुक्यतील दहा मंडळ अधिकारी

निवडले जातील. हिंगोली जिल्हयातील नमुना निवड पध्दतीनुसार प्रत्येक तालुक्यातुन तीन गावाची निवड करण्यात येईल.

तालुका	**गावाची संख्या**	**मोठे शेतकरी**	**मध्यम शेतकरी**	**लहान शेतकरी**
हिंगोली	०३	०५	०५	०५
सेनगांव	०३	०५	०५	०५
कळमनुरी	०३	०५	०५	०५
औंढा (ना.)	०३	०५	०५	०५
वसमत	०३	०५	०५	०५
एकुण	**१५**	**१५X५=७५**	**१५X५=७५**	**१५X५=७५**

प्रत्येक गावातुन पाच शेतक-यांची निवड मोठे शेतकरी,मध्यम शेतकरी, व लहान शेतकरी अशी निवड केली जाईल.एकुण गावाची संख्या १५ व निवडलेल्या शेतक-यांची संख्या प्रत्येक ७५ याप्रमाणे २२५ शेतक-यांची निवड करण्यात येईल व प्रश्नावलीद्वारे माहिती भरुन घेण्यात येईल.

<u>प्राथमिक सामग्रीमध्ये</u>

१) कृषी विभाग कार्यालयीन आकडेवारी.
२) कोष्टके ,आलेख, पायचार्ट, इ. चा वापर
३) जिल्ह्याचे संकेतस्थळ
४) मासिके, प्रातिक्षिक, वृत्तपत्रे, संकेतस्थळे इत्यादी.
५) जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत पुरविण्यात येणा-या योजनचा आधार घेण्यात येईल.

<u>संशोधन व्याप्ती व मर्यादा:</u>

प्रस्तुत संशोधन हिंगोली जिल्हा परिषद अंतर्गत कृषी विभाग,पंचायत समिती,कृषी विभागामार्फत जिल्ह्यातील शेतक-यांना मिळणा-या योजनाचा लाभ अभ्यासण्यात येणार आहे. यासाठी २००४ ते २०१४ हा दहा वर्षाचा कालावधी घेतला आहे.

प्रस्तुत संशोधन करत असतांना शेतक-यांच्या मुलाखती घेतांना अंदाजे माहिती सांगणे,खरी माहिती न सांगणे, पुर्वग्रह असणे या प्रकारच्या या प्रकारच्या संशोधनात मर्यादा पडतात.

अध्ययन प्रकरणाची रुपरेषा:

१) जिल्हा परिषद स्थानिक स्वराज्य संस्थाची पार्श्वभुमी.
२) हिंगोली जिल्हा पार्श्वभुमी .
३) जिल्हा परिषद कृषी योजने अंतर्गत राबविण्यात येणा-या विभागाच्या विविध योजनांचा अभ्यास करणे.
४) संशोधन साहित्याचा आढावा.
५) जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत योजनेतील लाभार्थी संख्या.
६) शेतक-यांना झालेल्या लाभाचे अध्ययन.
७) निष्कर्ष व शिफारसी.

संदर्भ ग्रंथ

१) संशोधन पध्दती शास्त्रे व तंत्रे-डॉ.प्रविण अग्रवाल.
२) भारतीय स्थानिक शासन-डॉ.शाम शिरसाठ.
३) महाराष्ट्रातील स्थानिक स्वशासन-डॉ.टि.एन.गायकवाड.
४) भारतातील स्थानिक स्वशासन-अ.ना.कुलकर्णी.
५) परभणी कृषी विद्यापीठ दैनंदिनी-२००९
६) महाराष्ट्र शासन संकेत स्थळ.
७) ग्रामिण विकास मंत्रालय संकेत स्थळ.
८) महाराष्ट्र राज्य आर्थिक पाहणी अहवाल.

९) जिल्हा वार्षिक योजना-जिल्हा नियोजन समिती कार्यालय,हिंगोली.
१०) अर्थ व सांखिकी संचालनालय,म.शा.मुंबई.
११) कृषी अर्थशास्त्र-शांता पंडीत
१२) भारतीय अर्थव्यवस्था-देसाई,भालेराव
१३) ॲग्रोवन साप्ताहिक
१४) दैनंदिन वर्तमानपत्रे
१५) पुर्व संशोधन संदर्भ आढावा इ.

संशोधन

भगवानराव भाऊराव मस्के

एम.ए.,एम.एड्.,एम.फिल

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.जे.एस.भोयर

कै.बाबुराव पाटील कला व विज्ञान

महाविद्यालय, हिंगोली-४३१५१३.